पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्रवि पहिली खबर क्र. FIR No. 33 वर्ष Year 2026 दिनांक Date 03/01/2026

2. (i) अधिनियम Act म.प्र.अधि.१९८८ कलमे Sections ७,

(ii) अधिनियम Act ..... कलमे Sections .....

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ..... तारीख पासून Date from 26/12/25 वेळ Time २८:०० तारीख पर्यंत Date to 02/01/26 वेळ Time २०:००

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 26/12/2026 वेळ Time २८:००

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/26 तारीख Date 03/01/2026 वेळ Time 04:20

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral .....

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. २८ कि.मी. ५ वेरसे चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. .....

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name महावितरण स्थापत्य विभाग भांडुप(प) मुंबई - ४०००७८ ठिकाणाचे नंबर No. if any ..... गल्ली Ward ..... रस्त्याचे नाव Name of road .....

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..... गाव Village ..... पोस्ट Post ..... तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State .....

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..... तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State .....

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name प्रतिभा ढोकणे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name राजेंद्र ढोकणे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9372429770

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..... दिल्याचा दिनांक Date of issue ..... दिल्याचे ठिकाण Place of Issue ..... (f) व्यवसाय Occupation पोलीस निरीक्षक

(g) धर्म Religion हिंदू जात Caste ..... जनजात Sub-Caste .....

(h) पत्ता Address ..... गल्ली/सर्व्हे नं. Ward ..... घर/नाव नं. House Name No. ..... फोन/मो. नं. Phone No. ..... पॅन नं. Pan No. ..... वोटर्स नं. Card No. .....

रस्त्याचे नाव Road ..... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..... गाव Village ..... पोस्ट Post ..... पो. स्टे. P. Stn .....

तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State ..... सध्याचा पत्ता Present Address .....

आचलपत्त प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई - ४०००३० भा.प्र.वि. मुंबई

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

देवेंद्र देवीरावजी गिल्लूरकर वय-५१ वर्षे, पद - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) महावितरण स्थापत्य विभाग, भांडुप (प) मुंबई, रा.ठी. प्लॉट ५०२, अन्नपूर्णा निवास पराडकर हॉस्पीटलच्या समोर - तीन बात नाका, ठाणे (प)

यातील फिर्यादी प्रतिभा राजेंद्र ढोकणे वय ३६ वर्षे यांचा दि. 03/11/2026 रोजी स्वतंत्र पानावर नोंद केलेला जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सचिन शेंडकर)
पोलीस निरीक्षक
त्याचलुघपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Dokane P.R.

(प्रतिभा ढोकणे)
पो.नि. लाप्रवि मुंबई

फिर्याद दिनांक ०३/११/२०२६

मी, प्रतिभा राजेंद्र ढोकणे, वय ३६वर्षे, धंदा : नोकरी (पोलीस निरीक्षक),नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मो.क्र. ९३७२४२९७७०

मी वरील प्रमाणे असून, दिनांक २०/०८/२०२५ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक २६/१०/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना, मला व सपोआ प्रविण नावडकर यांना मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्र ७४/२०२६ मध्ये पुढील कारवाईकरीता माझी सापळा अधिकारी व सपोआ नावडकर यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन लेखी आदेश केल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री संदेश दिंगबर मुळीक , वय ३७ वर्षे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी त्यांच्या स्व:हस्ताक्षरात मराठी भाषेमध्ये तक्रार अर्ज लिहून तो अर्ज आम्हास वाचण्यास दिला. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

''तक्रारदार श्री संदेश दिंगबर मुळीक व्यवसाय -गर्व्हनमेट कॉन्ट्रक्ट पत्ता-सी/२०, हितनिकेतेन बिल्डिग, ३ रा माळा कोकण नगर, भांडुप पश्चिम मुंबई ४०००७८ हे शासकीय ठेकेदार असुन त्यांचा सिव्हील कॉन्ट्रक्टरचा व्यवसाय आहे. सदर बाबत त्यांच्याकडे त्यांची कपंनी भगवती ईटरप्राईजेस च्या नावाने सिडकोचा परवाना आहे.

तक्रारदार यांनी महावितरण,स्थापत्य कार्यालय,भांडुप पश्चिम,मुंबई या कार्यालयाचे शासकीय ठेक्याने जुन २०२६ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अंदाजे २० कामे केली असुन,वेगवेगळया कामाची सदर कार्यालयात अंदाजे रक्कम रु २१ लाखाची बिले मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. सदर शासकीय काम हे लोकसेवक श्री देवेंद्र गिल्लुरकर, कार्यकारी अभियंता(स्थापत्य) यांच्या परवानगीसाठी प्रलंबित आहेत. दि २३/१०/२६ रोजी महावितरण कार्यालय येथील देवेंद्र गिल्लुरकर, कार्यकारी अभियंता(स्थापत्य) यांच्याकडे तक्रारदार हे गेले असता, लोकसेवक यांनी तक्रारदारास त्यांनी केलेल्या कामाचे बील पास करण्याकरिता त्यांच्याकडे , स्वत:च्या मोबाईलवर कॅलक्युलेटर ओपन करून त्यामध्ये १.८० असे टाईप करून लाचेची मागणी केली. त्यापैकी पहिला हफ्ता ९०,०००/-रू घेवुन येण्यास सांगितले.तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे वेळ मागितला तेव्हा त्यांनी परत येवुन भेटण्यास सांगितले. तदनंतर तक्रारदार हे दिनांक २६/१०/२०२६ रोजी दुपारी १२.४५ वा लोकसेवक यांच्या केबीनमध्ये गेले त्यावेळेस त्यांनी तक्रारदारास बीले मंजुर करायची असतील तर सांगितल्याप्रमाणे पैसे दयावे लागतील असे सांगितले व दि २७/१०/२०२६ रोजी पहीला हफ्त्याचे रु. ९०,०००/- घेवुन येण्यास सांगितले.

तक्रारदार यांना लोकसेवक श्री.गिल्लुरकर यांस लाच देण्याची इच्छा नसल्याने, ते दिनांक २६/१०/२०२६ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून लोकसेवक श्री देवेंद्र गिल्लुरकर, कार्यकारी अभियंता(स्थापत्य),महावितरण विभागीय कार्यालय,भांडुप हे लाच मागणी करत असल्याबाबत स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला.''

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह.शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री.गोकुळ कैलास पानगव्हाणे, वय २९वर्ष ,व्यवसाय-नोकरी,पद -सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयीन पत्ता-रिजनिल ट्रान्सपोर्ट ऑफिस,ईस्टन एक्सपेस हायवे,लुईस वाडी ठाणे (पश्चिम) ४००६०४ रा.ठि.फ्लॅट नं. बी/१०३,प्रतिक को ऑप हौ.सोसायटी, कुसुमाग्रज मार्ग, तुलशीधाम, समता नगर,ठाणे पश्चिम ४००६०१ २) श्रीमती विदया सुनिल शिंदे, वय ३१वर्ष, व्यवसाय-नोकरी,पद -सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, रिजनिल ट्रान्सपोर्ट ऑफिस,ईस्टन एक्सप्रेस हायवे ,लुईस वाडी ठाणे (पश्चिम) ४००६०४ रा.ठि. फ्लॅट नं./ई/२, २/१ आर्शिवाद को ऑप हौ. सोसायटी,सेक्टर नं १५,ऐरोली ४००७०८ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ नावडकर यांनी, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज हा मी ताब्यात घेतला.

तद्नंतर मी व पर्यवेक्षक अधिकारी सपोआ नावडकर यांनी पंचासमक्ष सांगितले की,तक्रारदार हे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी दिनांक २७/१०/२०२६ रोजी जाणार आहेत. तदनंतर दिनांक २७/१०/२०२६ रोजी पडताळणी कारवाईसाठी तक्रारदार व दोन्ही पंच हे हजर राहील्यानंतर त्यांना मी व सपोआ

File Opened on File Closed on

नावडकर यांनी पडताळणी कारवाईच्या सुचना दिल्या व त्यानंतर, मी व दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. रावराणे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन माझी, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार,दोन्ही पंच यांना पोलीस पथकाची पुन्हा ओळख करुन देवुन शासकीय वाहनाने लोकसेवकाच्या कार्यालयाकडे गेलो व कार्यालयापासुन काही अंतरावर गोपनीय रित्या थांबुन राहीलो. तदनंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.हवा. रावराणे यांनी तक्रारदार श्री संदेश दिंगबर मुळीक यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावला व चालु केला. तदनंतर तक्रारदार व पंच क्रमांक १ श्री. पानगव्हाणे हे लोकसेवकाच्या कार्यालयात गेले असता,कार्यालयात लोकसेवकाची भेट झाली व लोकसेवकाने पंच क्रमांक १ श्री पानगव्हाणे यांची विचारपुस करुन त्यांना बाहेर थांबण्यास सांगितले. पंच क्रमांक १ श्री पाानगव्हाणो हे बाहेर थांबल्यानंतर , लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेशी बीलाबाबत चर्चा करुन ,उदया सकाळी तक्रारदार यांच्या साईटवर भेटण्याचे निश्चीत केले. त्यामुळे पुढील पडताळणी व सापळा कारवाई ही दिनांक २८/१०/२०२६ रोजी करण्याचे ठरले.

तदनंतर दिनांक २८/१०/२०२६ रोजी पडताळणी व सापळा कारवाईसाठी तक्रारदार व दोन्ही पंच हे हजर राहील्यानंतर त्यांना मी व सपोआ नावडकर यांनी पडताळणी कारवाईच्या सुचना दिल्या व त्यानंतर दोन्ही पंच,तक्रारदार व आम्ही पोलीस पथक असे तक्रारदार यांची नेपच्युन सब स्टेशन भांडुप पश्चिम येथील साईटच्या जवळ आलो. तदनंतर मी पंच व तक्रारदार यांना तक्रारदार हे लोकसेवकास प्रथम मोबाईलवर फोन करुन भेटण्याची वेळ निश्चीत करणार असल्याचे सांगितले व त्याप्रमाणे शासकीय वाहनातच सदरवेळी तांत्रिक मदतनीस पो.ह. रावराणे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून , व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन माझी, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले.

तद्नंतर तक्रारदार हे लोकसेवक श्री गिल्लुरकर यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९७०२१५२३९६ यावरुन स्पीकर ऑन करुन लोकसेवक श्री.गिल्लुरकर यांस त्यांचे मोबाईल नं. ८८७९६२५०२१ यावर साधा कॉल करुन ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये समोरुन कॉल उचलला त्यावेळी लोकसेवक यांनी '' साडेअकरा पर्यत येतो मी.'' असे संभाषण करुन कॉल कट केला. तदनंतर थोडयावेळाने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.हवा. रावराणे यांनी तक्रारदार श्री संदेश दिंगबर मुळीक यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावला व चालु केला. तदनंतर तक्रारदार व पंच क्रमांक १ श्री. पानगव्हाणे हे लोकसेवकास भेटण्यासाठी नेपच्युन येथील साईटवर गेले त्यावेळी लोकसेवक व इतर लोकसेवक हे साईटवर मोजमापे घेत होते व तदनंतर जवळ असलेल्या तक्रारदारच्या यांच्या दुसरे साईटवरची मोजमाप घेतली व तेथुन लोकसेवक गिल्लुरकर,तक्रारदार व पंच क्रमांक १ पानगव्हाणे हे तेथील हॉटेलमध्ये गेले. त्यावेळी लोकसेवकाने पुन्हा पंच श्री पानगव्हाणे बाबत विचारणा केली व त्यांच्यासमक्ष त्यांनी तक्रारदार यांचेशी कामाबाबत चर्चा केली व चर्चा चालु असताना ,लोकसेवक यांनी तक्रारदारास केव्हा करते तेव्हा बाकीच काम करायचं असे म्हटले त्यांनतर तक्रारदार म्हणाले करतो सर, तेव्हा लोकसेवक म्हणाले उदया परवा, पाठवतो ना, तुला कुठे नाही म्हटल का थोडी, असे कामासंदर्भात संभाषण चालु होते व नंतर ते हॉटेलमधुन बाहेर आले व तक्रारदार हे परत आले.

तदनंतर तक्रारदार हे लोकसेवक श्री गिल्लुरकर यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९७०२१५२३९६ यावरुन स्पीकर ऑन करुन लोकसेवक श्री.गिल्लुरकर यांस त्यांचे मोबाईल नं. ८८७९६२५०२१ यावर व्हॉटसअप कॉल करुन ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये समोरुन कॉल उचलला त्यावेळी लोकसेवक गिल्लुरकर यांनी ऐक ऐक ऐक तु ऑफीसला ये, ऑफीसला ये. हा. असे संभाषण करुन फोन कट केला. तदनंतर आम्ही सर्व पथक हे लाप्रवि कार्यालयात येवुन दिनांक २८/१०/२०२६ रोजीचा पंचनामा केला व पुन्हा उदयक दिनांक २९/१०/२०२६ रोजी लोकसेवक श्री गिल्लुरकर यांस पडताळणी व सापळा कारवाईसाठी भेटण्यास जाण्याचे ठरले.

तदनंतर दिनांक २९/१०/२०२६ रोजी पडताळणी व सापळा कारवाईसाठी तक्रारदार व दोन्ही पंच हे लाप्रवि कार्यालयात हजर राहील्यानंतर त्यांना मी व सपोआ नावडकर यांनी पडताळणी व सापळा कारवाईच्या सुचना दिल्या व त्यानंतर दोन्ही पंच,तक्रारदार व आम्ही पोलीस पथक असे शासकीय वाहनाने लोकसेवकाच्या कार्यालयाकडे गेलो व कार्यालयापासुन काही अंतरावर गोपनीय रित्या थांबुन राहीलो. तदनंतर पो.हवा. रावराणे यांनी तक्रारदार श्री संदेश दिंगबर मुळीक यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही

किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला व चालु केला. तदनंतर तक्रारदार व पंच क्रमांक १ श्री.पानगव्हाणे हे लोकसेवकाच्या कार्यालयात गेले असता,कार्यालयात लोकसेवकाची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक श्री गिल्लुरकर यांनी पंच क्रमांक १ श्री. पानगव्हाणे यांस नजरेच्या इशाऱ्याने बाहेर थांबण्यास सांगितले. तदनंतर पंच पानगव्हाणे हे लोकसेवक यांच्या केबीन बाहेर थांबले. तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली व त्यामध्ये लोकसेवक गिल्लुरकर याने तक्रारदार यांना फोनवर नाही बोलायच जे काही आहे समोरा समोर, तदनंतर त्यांच्या वर्क कम्प्लेशन कामाबाबत चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक गिल्लुरकर हे तक्रारदार यांना म्हणाले की, मग तु बोल ना काय म्हणतोस ? तेव्हा तक्रारदार त्यांस बोलेले की, सर तुम्ही बोलले ना ते आता बिलाच वैगरे तो एकत्र सर मला दयायच शक्य नाही आहे सर, तेव्हा लोकसेवक म्हणाले, **'मग तुझ्या हयाच्याने स्टेप स्टेप मध्ये दे'**. तेव्हा तक्रारदार हे **' थोड थोड करुन देतो, दिड दोन लाख रूपये सर देणं शक्य, एकाच टायमला शक्य नाही** असे बोलेले. तदनंतर परत लोकसेवक गिल्लुरकर यांनी तक्रारदार यास **'तुझ्या हिशोबाने जस जस द्यायच तस तस दे. बाकी कुछ कर, बाद मे कुछ कर, उसके बाद मे कुछ कर, उसके बाद मे कुछ कर, तुला ही कठिण नाही झालं पाहिजे, मला ही कठिण नाही झालं पाहिजे'**. तेव्हा तक्रारदार म्हणाले , **'चालेल. थोडं थोडं करून करतो मग सर. एक, एक दोन तीन दिवसात करतो थोडं, थोडं थोडं करून अॅरेंजमेंट करू. काय झालयं सर बिल पण पेमेंट न आल्यामुळे पण भरपूर अडचण झाली आहे'**. तदनंतर लोकसेवक म्हणाले **'ठिक आहे. येईल ना आज ना उद्या पेमेंट येईल. त्याच्याशी काय झालं'**. तदनंतर तक्रारदार यांनी लोकसेवकास **'थोडं आता सर दिड दोन लाख रूपये तर शक्य नाही देणं, तर मी किती थोडं'** असे बोलेले असता लोकसेवक यांनी **'ठिक आहे. तुझ्या हिशोबाने दे असे बोलेले'**. तदनंतर तक्रारदार यांनी लोकसेवकास **'एक तीस चाळीस, तीस चाळीस अस किंवा करून देवु की पन्नास वगैरे?** असे म्हटले असता, लोकसेवकाने तक्रारदारास' **कसही कर, तुझ्या हिशोबाने. तुला जे कन्व्हीनियंट राहिल ते कर. तुला जे सुलभ जाईल व्यवस्थित जाईल त्या पध्दतीने'** असे बोलेले. त्यावेळी तक्रारदार यांनी **'पन्नास एक करतो सर मग मी'** असे लोकसेवकास म्हणाले. तदनंतर लोकसेवकाने **'ठिक आहे '**असे बोलेले. तदनंतर तक्रारदार यांनी **'दोन तीन दिवसात करतो असे बोलेले'** असे संभाषण करुन लोकसेवक गिल्लुरकर यांच्या कार्यालयातुन परत आले.

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटीत झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. गिल्लुरकर हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही दोनतीन दिवसाने घेणार असल्याने पुढील सापळा कारवाई ही दिनांक ०२/११/२०२६ रोजी करण्याचे ठरले.

दिनांक ०२/११/२०२६ रोजी तक्रारदार, पंच व पोलीस पथक असे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर मी व सपोआ नावडकर यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रुपये पन्नास हजार रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार मपोशि ०९-११७१/नलावडे यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ५०,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या १०० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर पो.ह.चालक भुजबळ, यांनी पंच व तक्रारदार यांना अॅथ्रोसिन पावडरचे गूणधर्म समजावून सांगितले. पो.ह.चालक भुजबळ यांचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू. ५०,०००/- या रक्कमेस अॅथ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एकत्रित करून पिस्ता रंगाच्या मोठया लिफाफ्यात ठेवुन सदर लिफाफ्यासदेखील बाहेरून अॅथ्रोसिन पावडर लावून तो लिफाफा तक्रारदार यांच्या निळया रंगाच्या सॅगमध्ये ठेवली. त्यानंतर मी पथकास सापळा कारवाईमध्ये पो.ह.चालक भुजबळ हे भाग घेणार नसल्याचे सांगितले.

दिनांक ०२/११/२०२६ रोजी महावितरण, विभागीय कार्यालय, भांडुप,मुंबई येथे सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यावेळेस पोलीस पथक महावितरण, विभागीय कार्यालय, भांडुप,मुंबई या ठिकाणी सापळा रचून थांबलेले होते. तक्रारदार व पंच क्रमांक १ श्री. पानगव्हाणे हे महावितरण, विभागीय कार्यालय, भांडुप,मुंबई येथे येथे गेले असता, लोकसेवक श्री गिल्लुरकर हे त्यांचे केबीनमध्ये नव्हते व थोडया वेळाने लोकसेवक श्री गिल्लुरकर हे तक्रारदार यांना त्यांच्या कार्यालयाच्या वाशरुमच्या पॅसेज मध्ये भेटले. पंचास बाहेर थांबण्यास इशारा व हावभावानंतर लोकसेवक श्री. गिल्लुरकर यांनी तक्रारदार यांना त्यांच्या केबीनमध्ये घेवुन गेले व तेथे बसून बोलणे सुरु झाले. काही वेळानंतर तक्रारदार हे लोकसेवकाच्या केबीनमध्ये बाहेर येवुन त्यांनी त्यांचे डावा हात डोक्यावरुन केसावर वारंवार फिरवुन लोकसेवकाने लाच स्विकारलेबाबत पूर्वनियोजित इशारा दिला. त्यानंतर मी,सपोआ नावडकर ,दोन्ही पंच व पथकाने लोकसेवक श्री गिल्लुरकर यांना त्यांच्या केबीनमध्ये १७.०० वा. पकडले.

सदर लोकसेवकास मी पोनि ढोकणे यांनी त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.देवेंद्र देवीरावजी गिल्लुरकर पद- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण,विभागीय कार्यालय,भांडुप,मुंबई असे सांगुन राहण्याचा पत्ता हा ५०२,अन्नपुर्णा निवास,पराडकर हॉस्पीटल,तीन हात नाका,ठाणे असे सांगितले. त्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत अधिक चौकशी केली असता, आरोपी लोकसेवक श्री. गिल्लुरकर यांनी सदर लाचेची रक्कम ही ते बसलेल्या टेबलाच्या त्यांचया उजव्या हाताच्या वरच्या ड्रॉवरवर असल्याचे सांगितले असता,ती रककम पंचासमक्ष जप्त करण्यात आली.

तरी आरोपी लोकसेवक श्री. देवेंद्र देवीरावजी गिल्लुरकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण, विभागीय कार्यालय, भांडुप,मुंबई यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी केलेल्या वेगवेगळया शासकीय सिव्हील ठेक्याचे कामाचे अंदाजे थकीत बिल रक्कम रु. २१ लाख हे मंजुर करण्यासाठी रु. १,८०,०००/- लाचेची मागणी केली. सदर लाच रक्कम ही हफ्त्याहफ्त्यामध्ये स्विकारण्याचे मान्य करुन पहीला हफ्ता रु. ५०,०००/- रक्कमेची लाच मागणी केली व तक्रारदार यांचेकडून लाच रक्कमपैकी रु. ५०,०००/- ही लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी लोकसेवक श्री गिल्लुरकर यांच्या विरोधात भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(सचिन शेंडकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Dokane P.R
(प्रतिभा ढोकणे)
पो.नि. लाप्रवि मुंबई

फिर्यादीने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..... तात्काळ .....

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .....

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .....

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता.के.डी व ढिकाणी कॉलम ७ मधील नमूद आरोपीताने त्याच्या कार्यालयातील शासकीय इस्यान काम केलेल्या तक्रारदार याची सिकलू कामाची वेगवेगळी अंदाजे रु. २१ लाखाची बिले मंजूर करण्याकरीता रु. १,८०,०००/- लाचेची मागणी केली. सदर लाच रक्कम ही तडजोडी अंती रु. ५०,०००/- रक्कमेची लाच मागणी केली व तक्रारदार याचेकडून लाच रक्कमे पैकी रु. ५०,०००/- ही लाच रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्याच्याविरुद्ध भ्र.प्र.आधि १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ..... सपोउनि गंगाप्रसाद मुदीराज, ला.प्र.वि., मुंबई .....

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ..... Rank ..... No. .....
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .....

(3) Transferred to P. S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

Rokane P.R

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ..... सचिन रोंडकर .....
पदनाम Rank ..... पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई .....
तपासिक अ. चा कोड क्र. .....
Posting
Code No. of I. O. .....

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..... 03/11/2026 .....
1. Date and time of submitted to the Court.

प्रत	2 फिर्यादी,	3. पोलीस अधीक्षक (संगणक),	4. तपासिक अंमलदार,	5. स्थळ प्रत.
Copy to	2. Complainant,	3. Supdt. of Police (Computer),	4. Inv. Officer,	5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report